स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

“निवडक मराठी कवयित्रींच्या कवितेतील आंबेडकरी विचारप्रवाहांचा चिकित्सक अभ्यास”

मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी.

पदवीकरिता सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

: संशोधक विद्यार्थी :

प्रज्ञा तोलाजीराव अटकोरे

एम.ए., बी.एड., सेट (मराठी)

: मार्गदर्शक :

प्रोफेसर डॉ. सूर्यप्रकाश जाधव

हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,

हिमायतनगर

ऑक्टोबर २०२३

“निवडक मराठी कवयित्रींच्या कवितेतील आंबेडकरी विचारप्रवाहाचा चिकित्सक अभ्यास”

प्रस्तावना :—

मराठी साहित्याच्या क्षेत्रात १९६० च्या दशकानंतर मोठ्या प्रमाणात क्रांतिकारी बदल घडून आले. भारतीय स्वातंत्र्य, समता व लोकशाही या तत्त्वप्रणालीने एकूणच भारतीय समाज जीवन विकासाच्या दिशेने मार्गक्रमण करीत होते. आधुनिक भारताच्या व महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मोठे वैचारिक योगदान लाभले आहे. त्यांनी दिलेल्या शिका, संघटित व्हा व संघर्ष करा..! या त्रिसूत्रीच्या आधारे येथील बहुजन समाज जागा झाला. हा समाज स्वत:च्या अस्मितेचा शोध साहित्याच्या माध्यमातून घेऊ लागला. या विचारप्रवाहातूनच दलित साहित्याने आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. दलित साहित्याचेच विकसित रूप म्हणजे आंबेडकरी साहित्य प्रवाह होय. या आंबेडकरी विचार प्रवाहांनी जीवनाच्या परिवर्तनाची नवी दिशा शोधली व साहित्यरुपी नवजीवन मार्ग निर्माण करण्याची क्षमता देखील तयार केली.

आंबेडकरी साहित्य विचारप्रवाहाच्या निर्मितीला चार्वाक, बुद्ध, शाहू, फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रमाबाई आंबेडकर यांच्या वैचारिक कार्याचे अधिष्ठान लाभले. यातूनच मराठी साहित्याच्या क्षेत्रात आंबेडकरी विचारप्रवाहाचा जन्म झाला. परंपरेने ग्रासलेल्या विचारसरणीला नकार देत, विज्ञानवादी तत्त्वज्ञानाचा स्वीकार केला. वैश्विक मानवतावाद या तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून साहित्यरूपाने पुढे आला.

‘कविता’ हा वाङ्मय प्रकार आंबेडकरी साहित्यात मोठ्या प्रमाणात लिहिला गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने जागृत झालेल्या प्रतिभा पहिल्यांदाच सहजपणे कवितेच्या माध्यमातून अविष्कृत झाल्या. कथा, नाटक, कादंबरी, आत्मचरित्र, आत्मकथन, स्व—कथने,

समीक्षाग्रंथ याबरोबरच अखिल भारतीय आंबेडकरवादी साहित्य संमेलने देखील भरू लागले. आज पर्यंत म्हणजेच १९९३ ते २०१७ पर्यंत एकूण १३ साहित्य संमेलने संपन्न झाली. या संमेलनाच्या माध्यमातूनच पुढे 'अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य व सांस्कृतिक संवर्धन मंडळ नामक' संस्थेची स्थापना करण्यात आली. एकूणच आंबेडकरी साहित्य आज वैश्विक स्तरावर स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करू लागले आहे.

विषय निवडीचे महत्त्व :—

प्रस्तुत संशोधन विषयाचे महत्त्व लक्षात घेता एकूणच मानवी जीवनाचे बदलते संदर्भ, मानवतावाद, वैज्ञानिक दृष्टिकोन, बदलती जीवनशैली, सुधारणावादी दृष्टिकोन, परंपरेला छेद देण्याचे सामर्थ्य, आज्ञानावर ज्ञानाने मात करत प्रकाशवाटा शोधणारे आंबेडकरी विचारप्रवाह हा एकूणच मानवतावादी दृष्टिकोन जोपासतो. हे आंबेडकरी साहित्य वास्तव जीवनानुभव व विज्ञानवाद यांच्या स्वीकारामुळे समग्र मानवतेचे प्रतीक म्हणून प्रतिनिधित्व करतो. आंबेडकरी विचारप्रवाह सकस व दर्जेदार होण्यासाठी अनेक लेखक, लेखिका, कवी व कवयित्री आणि अभ्यासक प्रयत्न करत आहेत. त्यामुळे आंबेडकरी साहित्याचे वर्तमानकालीन संदर्भ आजच्या मराठी साहित्यात प्रतिबिंबित होताना दिसते. म्हणून हा विषय अभ्यासणे मला महत्त्वाचे वाटते.

विषय निवडीची कारणे :—

आंबेडकरी विचारप्रवाहाचा सामाजिक, सांस्कृतिक, धम्मविषयक, आर्थिक, मानवतावादी, समतावादी, भाषिक, परिवर्तनवादी, रूढीला छेद देणारी, परंपरेला नाकारणारी व विज्ञानवाद स्वीकारणाऱ्या अशा विविध घटकांनी युक्त विषयांचा अभ्यास करणे व त्यातून मानवी जीवन जगण्याचा वास्तव अर्थ शोधणे. अशा मानवतावादी साहित्याचे जतन करणे हे या अभ्यास विषयाच्या दृष्टीने महत्त्वाचे वाटते.

विषय निवडीचे उद्दिष्टे :—

आंबेडकरी विचारप्रवाहाच्या कवितेतून साकारलेले वास्तव जीवन चित्रण हे वैश्विक स्तरावरील मानवतावादाचे प्रतिनिधित्व करते. स्वत्वाकडून सामूहिकतेकडे आणि सामूहिकतेतून

वैश्विकतेकडे आपल्या जीवनाचा प्रवास साकारते. निवडक मराठी आंबेडकरी कवयित्रींच्या काव्यसंग्रहाचा अभ्यास करून प्रस्तुत संशोधन विषयाला योग्य न्याय देणे.

अभ्यास पद्धती :–

सदरील विषयाचे संशोधन करताना.

१. क्षेत्रिय अभ्यास पद्धती.

२. उपलब्ध साधनसामग्री.

३. निवडक कवयित्रींच्या प्रत्यक्ष मुलाखती. (छायाचित्रिकरणासह)

४. इंटरनेट, मासिके, वृत्तपत्रे, चर्चासत्रे, संमेलने इत्यादी दुय्यम अभ्यास पद्धतींचा वापर करून पुढील प्रकरणांचा सविस्तर अभ्यास करणे प्रस्तुत संशोधक अभ्यासकांचा संकल्प आहे. पुढील नियोजित प्रकरणानुसार सदरील संशोधनाच्या अनुषंगाने अभ्यास करण्यात येईल व शेवटी योग्य ते निष्कर्ष मांडून या विषयाला योग्य तो न्याय देता येईल.

प्रकरण पहिले

आंबेडकरी साहित्य पार्श्वभूमी, स्वरूप व संकल्पना

प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून एकूण आंबेडकरी साहित्याचा परिचयात्मक आढावा घेत आंबेडकरी साहित्य पार्श्वभूमी, आंबेडकरी साहित्याचे स्वरूप, आंबेडकरी साहित्याच्या प्रेरणा, आंबेडकरी साहित्याच्या व्याख्या, आंबेडकरी साहित्याची संकल्पना यांचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण दुसरे

साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहात आंबेडकरी साहित्याचे स्थान

मराठी साहित्य क्षेत्रात आंबेडकरी साहित्य प्रवाह हा परिवर्तनाचा प्रवाह म्हणून ओळखला जातो. साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहातील विविध साहित्य प्रवाहांचा परिचय देणे त्या परिवर्तनाच्या प्रवाहांचा अभ्यास करत आंबेडकरी विचारप्रवाहाचे मराठी साहित्यातील योगदान अभ्यासणे व आंबेडकरी विचारप्रवाहाच्या बदलत्या स्वरूपाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

प्रकरण तिसरे

निवडक मराठी कवयित्रींच्या कवितेतील आंबेडकरी विचार

प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून निवडक कवयित्रींच्या कवितेतील आंबेडकरी विचार प्रवाहाचा अभ्यास करणे, काव्यसंग्रहातील विविधांगी जीवन दर्शन, वास्तव जीवनानुभव, परिवर्तनाची वाटचाल, विज्ञानवादाचा केलेला स्वीकार व परंपरेला दिला गेलेला नकार या सर्व घटकांच्या आधारे प्रस्तुत काव्यसंग्रहांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

प्रकरण चौथे

आंबेडकरी विचारप्रवाह आणि वाङ्मयीन जीवन मूल्ये

साहित्याचा आणि जीवनमूल्ये यांचा संबंध हा आंबेडकरी काव्यविचाराचा मध्यवर्ती विशेष आहे. त्यात प्रामुख्याने उदात्त जीवनमूल्ये, समग्र मानवतेला कवेत घेण्याची व्यापकता, अज्ञानावर मात करण्याची क्षमता, उपेक्षितांना न्याय मिळवून देण्याची वृत्ती व उदात्त मानवतावाद या सर्वांचा अन्वयार्थ आंबेडकरी विचार प्रवाह आणि वाङ्मयीन जीवन मूल्यांमध्ये स्पष्ट होतो हे सर्व संदर्भ अभ्यासणे महत्त्वाचे आहेत.

प्रकरण पाचवे

निवडक मराठी आंबेडकरी कवयित्रींच्या कविता

यात प्रामुख्याने प्रस्तुत संशोधन विषयातील जे संदर्भ दिले गेले आहेत त्या काव्यसंग्रहाचा अभ्यास करणे.

१. ‘मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा’ – प्रज्ञा पवार.(लोखंडे)

२. ‘यशोधरेची लेक’ – आशालता कांबळे.

३. ‘सूर्याचा सूर्य’ – मनीषा कांबळे.

४. ‘पिंपळ ओल पिळली जातेय...’– श्वेता एंगडे.

५. ‘तरीही मूळ ओल धरून आहे’–सुरेखा भगत. इत्यादी.

प्रकरण सहावे

उपसंहार व निष्कर्ष

या प्रकरणाच्या माध्यमातून निवडक मराठी आंबेडकरी कवयित्रींच्या प्रत्यक्ष मुलाखती (छायाचित्रीकरणांसह) घेऊन त्यांच्या वास्तव जीवनातील समस्या आणि प्रश्नांचा शोध घेतला जाईल.

१ परिशिष्ट, मुलाखती.

२ संदर्भ ग्रंथ.

संदर्भ ग्रंथसूची

१. डॉ. यशवंत मनोहर – आंबेडकरवादी मराठी साहित्य युगसाक्षी प्रकाशन, नागपूर– ४४००२२ द्वि. आवृत्ती ३१ मे २०१२.

२. डॉ. यशवंत मनोहर – आंबेडकर चळवळ आणि साहित्य, अभय प्रकाशन, नागपूर –२७, प्र. आ. २४. १०. १९९३

३. डॉ. निळकंठ शेरे – आंबेडकरवाद, सुविद्या प्रकाशन, पुणे– ४१०३३०, प्र. आ. १४ .४ . २००९.

४. डॉ. मनोहर जाधव – परिवर्तनाचे प्रवाह, पद्मगंधा प्रकाशन, पुणे –४११०३८.

५. अविनाश डोळस – आंबेडकर विचार आणि साहित्य, साकेत प्रकाशन प्रा लिमिटेड, औरंगाबाद– ४३१००५ द्वि. आ. २००९.

६. राजा ढाले–दलित पॅंथरची स्थापना वस्तुस्थिती आणि विपर्यास,फुले आंबेडकर विचारधारा–मुंबई.

७. सुरेश साबळे – परिवर्तनवादी चळवळी चिंतन आणि प्रबोधन, पुस्तक मार्केट कॉम जून– २०२२.

८. आंबेडकरवादा पुढील नवी आव्हाने, समय प्रकाशन, पुणे–४१०५०४ प्र. आ. १९ फेब्रुवारी २०१८.

९. प्रज्ञा पवार– मी भिडवू पाहते समग्राशी डोळा, ग्रंथाली प्रकाशन २००७.

१०. प्रा. आशालता कांबळे– यशोधरेची लेक.

११. मनीषा कांबळे – सूर्याचा सूर्य, प्र. आ. २००९.

१२. सौ. श्वेता चंद्रशेखर एंगडे–पिंपळ ओल पिळली जातेय...–शब्दवेध प्रकाशन, औरंगाबाद –४३१००३ प्र. आ. २०२२.

१३. डॉ. गंगाधर पानतावणे– आंबेडकरी जाणिवांची आत्मप्रत्ययी कविता–गोदा प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २०१०

संशोधक विद्यार्थी

प्रज्ञा तोलाजीराव अटकोरे

एम.ए., बी.एड.,सेट. (मराठी)

मार्गदर्शक

प्रोफेसर डॉ. सूर्यप्रकाश जाधव

हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,

हिमायतनगर